# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**कामोठे (ता.पनवेल, जि.रायगड)येथील रुग्णालयातील बायोमेडिकल वेस्टची शास्त्रशुध्द पध्दतीने विल्हेवाट लावण्याबाबत**

**(१) १७६२ (२३-१२-२०१४). श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कामोठे (ता.पनवेल, जि.रायगड) येथील रुग्णालयातील बायोमेडिकल वेस्टची शास्त्रशुध्द पध्दतीने विल्हेवाट लावण्याऐवजी ते मोकळ्या भुखंडावर टाकण्यात येते त्यामुळे त्या वसाहतीतील स्थानिक नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रदुषण नियंत्रण मंडळ व सिडको प्रशासन यांनी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१८-०५-२०१६) :**(१) हे खरे नाही, कामोठे, ता.पनवेल येथील दवाखान्यातील बायोमेडिकल वेस्ट मोकळ्या भुखंडावर किंवा इतरत्र वसाहतीत टाकले जात नाही. कामोठे येथील मुंबई वेस्ट मॅनेजमेंट, तळोजा यांचेकडील वाहन नियमित येवून सदर बायोमेडिकल वेस्ट शास्त्रशुध्द पध्दतीने विल्हेवाट लावण्यासाठी घेवून जाते. त्यामुळे वसाहतीतील स्थानिक नागरिकांचे आरोग्यास कोणताही धोका नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौजा घोबाडी (ता.काटोल, जि.नागपूर) येथे पाणलोट योजनेच्या कामात आदिवासी मजुरांना काम न देता जेसीबी मशिनने नाला खोदल्याबाबत

**(२) २११२५ (१६-०९-२०१५). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हा कोंढाळी अंतर्गत १४ कि.मी. अंतरावर मौजे घोबाडी येथे पाणलोट योजनेचे कार्य सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वन अधिकाऱ्याने आदिवासी मजुरांना काम न देता जेसीबी ने नाले खोदल्या आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, कोंढाळी मौजे घोबडी येथील ग्रामीण भागातील मजूरांना योजनेतून वन अधिकाऱ्यांनी हद्दपार केले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त पाणलोट योजना राबवितांना वन अधिकाऱ्यांचा या चुकीच्या कारवाईची चौकशी केली आहे काय,

(५) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-०५-२०१६) :**(१) व (२) होय, हे खरे आहे.

मौजे घोबाडी ता.काटोल जि.नागपूर हे गाव ग्रामीण पायाभूत विकास निधी (RIDF) या योजनेअंतर्गत समाविष्ट आहे. पाणलोट विकास योजनेअंतर्गत सविस्तर आहे. पाणलोट विकास योजनेअंतर्गत सविस्तर आराखडयात (DPR) मंजूर असलेली कामे वन परिक्षेत्र अधिकारी, कोंढाळी हे करीत आहेत, या वनक्षेत्रामध्ये सलग समतल चर, हे काम यंत्राच्या सहाय्याने करण्यात आले आहे.

(३) हे खरे नाही,

मौजे घोबाडी या क्षेत्रात मजूर उपलब्ध नाहीत तसेच वनजमिनीवर बराच भाग खडकाचा असल्यामुळे सलग समतल चराचे काम मजूरादवारे करणे अवघड आहे. त्यामुळे यंत्रादवारे करावयाचे कामाचे अंदाजपत्रक तयार करुन यंत्राने कामे करण्यात आली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पालघर जिल्हयात वर्तमान वर्षात 'जलयुक्त शिवार' या योजनेअंतर्गत सुरु असलेल्या कामांबाबत

**(३) २२७७७ (१४-०८-२०१५). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयात वर्तमान वर्षात 'जलयुक्त शिवार' या योजनेअंतर्गत एकूण किती ठिकाणी कामे सुरु असून सदरहू कामे जिल्हयातील कोणत्या तालुक्यात व गावात चालु आहेत,

(२) सदरहू कामासाठी अंदाजे आतापर्यंत किती रक्कम खर्च झाला आहे,

(३) सदरहू योजनेद्वारे कोण कोणती कामे करण्यात आली व त्यापैकी किती कामे पूर्ण झाली व किती कामे प्रगतीपथावर आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-०५-२०१६) :**(१) पालघर जिल्ह्यात पालघर, वसई, डहाणू, तलासरी, वाडा, विक्रमगड, जव्हार, मोखाडा या ८ तालुक्यात एकूण ५० गावांमध्ये जलयुक्त शिवार अभियानाची कामे सुरु आहेत, ती पुढीलप्रमाणे

**पालघर-** उमरोळी, कोसबाड, खरशेत, वाकसई

**वसई-** भाटपाडा, पोमण, आडणे, भिनार

**डहाणू-** जामशेत, शिसने, चरीपावन, गंजाड

**तलासरी-** डोलारपाडा, करजगाव, उपलाट, वसा

**वाडा-** हमरापूर, गोऱ्हे, उज्जेन, तुसे, गालतरे

**विक्रमगड-** साखरे, उपराळे, उटावली, खोस्ते,

**जव्हार-** कासटवाडी, जुनी जव्हार, काशिवली, डेगांची मेट, सारसुन, माळघर, दादरकोपरा, न्याहाळे, रायतळे, धानोशी, जांभूळमाथा,

**मोखाडा-** बेरीस्ते, आसे, चास, धामणी, सूर्यमाळ, डोल्हारा, ब्राम्हणगाव, खोच, किनीस्ते, कारेगाव, निळमाती, पोशेरा, उधळे, जोगलवाडी

(२) जलयुक्त शिवार अभियानांतर्गत आतापर्यंत रु. ११३२.०४ लाख खर्च झाले आहे,

(३) सदरहू योजनेद्वारे कंपाटमेंट बंडिग, सलग समतलचर, माती नाला बांध, खोल सलग समतल चर, लूज बोल्डर स्ट्रक्चर, सिमेंट बंधारा दुरुस्ती, माती नाला बांध दुरुस्ती, के.टी.वेअर, गाळ काढणे, वृक्ष लागवड, पक्के बंधारे अशी २७ प्रकारची कामे हाती घेण्यात आली असून आता पर्यंत ८९३ प्रकारची कामे पूर्ण झाली आहेत व १५० कामे प्रगती पथावर आहेत.

---

**जळगाव जिल्ह्यातील उपजिल्हा रुग्णालयातील विना निवीदा कामातील गैरकारभाराबाबत**

**(४) २४७४५ (१४-०८-२०१५). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यात रुग्णालय व ग्रामीण रुग्णालयात सध्या तात्कालीन वेळेत ग्रामीण रुग्णालय चालू असलेल्या सुरक्षा रक्षकांच्या सेवा कामाच्या निवीदा प्रक्रिया गेल्या पाच वर्षात केल्या नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विना निविदा कामे दिलेल्या संस्थाची नावे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले, तदनुसार विना निविदा कामे दिलेल्या संबंधित दोषीं अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१९-०५-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लघु सिंचन (जलसंधारण), मंडळ अमरावती या कार्यालयामार्फत ई-निविदेनुसार निधीच्या वाटपात झालेली विषमता**

**(५) २५२६८ (१७-०९-२०१५). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लघु सिंचन (जलसंधारण), मंडळ अमरावती या कार्यालयामार्फत ई-निविदा सुचना क्र. ब/०४/२०१४-२०१५ अंतर्गत यवतमाळ जिल्हयातील ई-निविदा काढण्यात आल्या परंतु निविदेनुसार निधीचे वाटपामध्ये मोठ्या प्रमाणात विषमता दिसुन आली, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, फेरनिविदा काढण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी (आर्णी) यांनी अधिक्षक अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण), मंडळ अमरावती यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निवेदनावर कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासन काय कार्यवाही करणार आहे,

(५) नसल्यास, त्याचे कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-०५-२०१६) :**(१) हे खरे नाही.

ई-निविदा सुचना क्र.बी-१/०४/२०१४-०५ या निविदेअंतर्गत यवतमाळ जिल्हयातील १२ तालुक्यातील ४९ निविदांमध्ये १०८ सिमेंट नाला बांधाची कामे अंतर्भुत आहेत.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) जिल्हाधिकारी यांनी प्रशासकीय मान्यता प्रदान केलेल्या कामांच्या प्रारुप निविदा मंजूरीनंतर नियमानुसार ई-निविदा कार्यवाही करण्यात आली आहे.

सन २०१५-२०१६ मध्ये प्रथम टप्प्यात यवतमाळ जिल्हयात १७२ कामांच्या ७७ ई-निविदा काढण्यात आल्या आहेत. त्यापैकी आणि केळापूर मतदारसंघात २८ कामांचा समावेश आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पालघर जिल्हयामध्ये डहाणू तालुक्यात शासकीय उपजिल्हा रुग्णालयात (कॉटेज हॉस्पिटल) आरोग्य सुविधांचा अभाव असल्याबाबत**

**(६) २५७८८ (१७-०८-२०१५). श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयामध्ये डहाणू तालुक्यात शासकीय उपजिल्हा रुग्णालयात (कॉटेज हॉस्पिटल) आरोग्य सुविधांचा अभाव, यंत्रसामुग्रीकडे दुर्लक्ष तसेच सोनोग्राफी प्रशिक्षित कर्मचारी वर्ग नसल्याने शेकडो आदिवासी भागातील रुग्णांची गैरसोय होत आहे असे दिनांक १७ एप्रिल, २०१५ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केलेली आहे,

(३) असल्यास, रुग्णांवर आरोग्याच्या असुविधेवर तातडीची कोणती उपाययोजना केलेली आहे काय,
(४) असल्यास, सोनोग्राफी प्रशिक्षित कर्मचारी वर्गाची नेमणूक होणार आहे काय, व कधी,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१८-०५-२०१६) :**(१) हे अंशत: खरे आहे.
(२), (३) व (४) उपजिल्हा रुग्णालय, डहाणू येथे सोनोग्राफी मशील चालू स्थितीत आहे. परंतु रेडिओलॉजिस्ट हे पद भरण्यात आलेले नाही. सदरहू पद कंत्राटी पध्दतीने भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. तसेच तेथे कार्यरत असलेल्या स्त्रीरोगतज्ञांकडून सोनोग्राफी करुन घेण्याबाबत व प्रतिनियुक्तीवर क्ष-किरणतज्ञ उपलब्ध करुन देण्याबाबत क्षेत्रिय कार्यालयाला निर्देश देण्यात आलेले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात जलयुक्त शिवाराची कामे करण्याकरिता चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा तालुक्यात निवड झालेल्या शेतक-यांना निर्धारित रक्कमेची पावती न दिल्याबाबत

**(७) २७०८८ (१७-०९-२०१५). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने राज्यात जलयुक्त शिवाराची कामे करण्याकरिता निवड झालेल्या शेतकऱ्यांकडून शिवाराचे काम करण्याकरिता शासनाने निर्धारित केलेली रक्कम घेण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा तालुक्यात निवड झालेल्या शेतक-यांकडून निर्धारित रक्कम घेण्यात आले परंतु त्यांची पावती देण्यात आली नसल्याचे माहे जून, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, यांस जबाबदार असणा-या अधिकारी/कर्मचा-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) अद्याप कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-०५-२०१६) :**(१) हे अंशत: खरे आहे,
जलयुक्त शिवार अभियानांतर्गत निवडलेल्या गावात एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत मृदसंधारण कामासाठी संबंधीत लाभार्थ्यांकडून मार्गदर्शक सूचनेप्रमाणे अ.जा.व अ.ज. लाभार्थ्यांकडून ५ टक्के व इतर लाभार्थ्यांकडून १० टक्के रक्कम घेण्यात येते व पाणलोट विकास निधीत जमा करण्यात येते,
(२) हे खरे नाही,
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासकीय कर्मचा-यांच्या वैद्यकिय देयकाच्या रक्कमेत वाढ करण्याबाबत**

**(८) २८७४८ (१४-०१-२०१६). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय कर्मचाऱ्यांच्या वैद्यकिय देयके एक लाख रुपयांवरुन दोन लाख रुपयांपर्यंत वाढविण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णय शिक्षकांना व सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्यांनाही लागू करण्यात आला आहे काय, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निर्णयाच्या अनुषंगाने कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे ?

**डॉ. दीपक सावंत (१८-०५-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) विभाग प्रमुखांना असलेली वैद्यकीय खर्चाची देयके मंजूर करण्याची रु. १,००,०००/- पर्यंतची मर्यादा वाढवून रु. ३,००,०००/- पर्यंत करण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक १६/३/२०१६ रोजी निर्ममित करण्यात आला आहे.

---

**उल्हासनगर (जि.ठाणे) येथील कामगार रुग्णालयातील समस्यांबाबत**

**(९) २८७९३ (२१-०१-२०१६). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापूर व भिवंडी या भागात कारखान्यांचे मोठ्या प्रमाणात जाळे पसरले असल्याने त्या भागातील कामगारांना व कुटुंबियांना आरोग्य सुविधा व औषधोपचार मिळावे यासाठी असलेले एकमेव उल्हासनगर येथील कामगार रुग्णालयात अपुरा कर्मचारी वर्ग, औषधांचा तुटवडा व रुग्णालयाची दुरावस्था दूर व्हावी यासाठी शासनाकडे मुख्य वैद्यकीय अधिकारी यांनी कामगार रुग्णालयांना निधी उपलब्ध करून द्यावा अशी मागणी वारंवार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामगार रुग्णालयाला निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासन स्तरावरील निर्णयाची सद्य:स्थिती काय आहे व त्यानुषंगाने आतापर्यंत किती निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे,

(३) अद्याप निधी उपलब्ध करून दिला नसल्यास त्यासाठी अजून किती कालावधी अपेक्षित आहे ?

**डॉ. दीपक सावंत (१८-०५-२०१६) :**(१) हे अंशत: खरे आहे.

उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापुर व भिवंडी येथे ४,५६१ कारखाने राकावि योजनेच्या व्याप्ती क्षेत्रात (Coverage) असून या भागात ७२,९१४ नोंदणीकृत विमाधारक व सुमारे ९१

लाख लाभार्थी आहेत. या सर्वांना राकावि योजनेअंतर्गत ६० विमा वैद्यकीय व्यवसायी व २ रा.का.वि.यो. सेवा दवाखान्यांमार्फत प्राथमिक वैद्यकीय सेवा तर राकावियो रुग्णालय उल्हासनगर मार्फत विशेषज्ञ बाह्य व आंतररुग्ण सेवा पुरविण्यात येतात.

राकावियो रुग्णालय उल्हासनगर येथे एकूण २४८ पदे मंजुर असून त्यापैकी १५१ भरलेली तर ९७ पदे रिक्त आहेत. तथापि रिक्त पदांमुळे रुग्णसेवेत अडथळा निर्माण होऊ नये या करिता वेळोवेळी राकावि महामंडळामार्फत अंशकालीन विशेषज्ञांची नेमणूक करण्यात येत असून शासनामार्फत बंधपत्रित वैद्यकीय अधिकारी व परिचारीका यांची नियुक्ती करण्यात येते. सद्यस्थितीत सदर रुग्णालयात राकावि महामंडळामार्फत ०१ विशेषज्ञांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच राकावि योजना राज्य कार्यकारी समितीच्या ४ थ्या बैठकीतील निर्णयानुसार रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

राज्य कार्यकारी समितीच्या अध्यक्षांच्या निर्देशानुसार आरोग्यसेवा संचालनालयामार्फत राकावि योजनेकरिता औषधे उपलब्ध करुन घेण्यात आली आहेत. सन २०१५-१६ च्या हिवाळी अधिवेशनात रु. १५.६१ कोटीची पुरवणी मागणी मंजूर केली आहे.

सदर रुग्णालयाची इमारत हि राकावि महामंडळ, श्रम मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या मालकीची असून रुग्णालयाच्या रुग्णालय विकास समितीमार्फत सन २००९-१० व २०१०-११ मध्ये रुग्णालयाच्या विशेष दुरुस्ती करिता अनुक्रमे रु.१२,०५,९६५ व रु.२६,७९,०५७ इतका खर्च करण्यात आला आहे. ज्या राकावियो इमातरी २५ वर्षापेक्षा जास्त जुन्या आहेत त्या इमारतीचे Structural audit करुन घेण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(२) शासनाने सन २०१५-१६ च्या हिवाळी अधिवेशनात औषधाच्या प्रलंबित देयकासाठी प्रस्तावित रु.१५.६१ कोटींची पुरवणी मागणी मंजुर केली असून त्यापैकी रु. १४.०५ कोटी इतका निधी उपलब्ध झालेला आहे. त्या अनुषंगाने सदर रुग्णालयाची औषधांची प्रलंबित देयके अदा करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सिंधुदुर्ग जिल्हयातील आरोग्य यंत्रणेचा दर्जा सुधारण्यासाठी उपयोजना करण्याबाबत

**(१०) २८८४५ (२१-०१-२०१६). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्हयातील आरोग्य यंत्रणा साथीच्या रोगांवर नियंत्रण ठेवण्यामध्ये अपयशी ठरल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरोग्य यंत्रणेतील त्रुटी, दर्जेदार औषधांचा तुटवडा तसेच डॉक्टरांची रिक्त पदे याला जबाबदार असल्याचे समजते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आरोग्य प्रशासनाने केलेल्या औषधांचा पुरवठा जिल्हयातील रुग्णांची संख्या पाहता खूपच कमी असल्याचे कळते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील साथीच्या रोगांवर नियंत्रण ठेवण्याकरिता शासन काही ठोस उपाययोजना करणार आहेत काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१८-०५-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) साथीच्या आजारावर नियंत्रण ठेवण्यासाठी खालील उपाययोजना नियमितपणे केल्या जातात.

• दैनंदिन साथरोग सर्वेक्षण
• पाणी गुणवत्ता सनियंत्रण
• स्वच्छता सर्वेक्षण
• नियमित किटकशास्त्रीय सर्वेक्षण
• साथरोग निदान व उपचार सुविधा
• विविध साथरोग संदर्भात शासकीय व खाजगी डॉक्टरांच्या प्रशिक्षण कार्यशाळा
• साथरोग नियंत्रण संदर्भात वार्षिक कॅलेंडर व अंमलबजावणी
• जनतेचे प्रभावी आरोग्य शिक्षण

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मलकापूर (ता.शाहुवाडी, जि.कोल्हापूर) येथील ग्रामीण रुग्णालय केंद्रात वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(११) २९०७५ (२१-०२-२०१६). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मलकापूर (ता.शाहुवाडी, जि.कोल्हापूर) येथील ग्रामीण रुग्णालय केंद्रात वैद्यकीय अधिकाऱ्यांची ३ मंजूर पदांपैकी १ पद रिक्त आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येथील ग्रामस्थांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरची रिक्त पदे भरण्याकरिता शासन कोणती कार्यवाही करणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१९-०५-२०१६) :**(१) होय.
(२) हे खरे नाही.
ग्रामीण रुग्णालय, मलकापूर, ता.शाहुवाडी, जि.कोल्हापूर येथे १ वैद्यकीय अधिक्षक या पदासह ३ वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे नियमित स्वरुपात भरलेली आहेत. तसेच आयुष अंतर्गत २ वैद्यकीय अधिकारी व १ दंत चिकित्सक करार पध्दतीने कार्यरत आहेत व त्यांच्यामार्फत रुग्णांना वेळच्या वेळी रुग्णसेवा पुरविण्यात येत आहे.

(३) सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत ग्रामीण आरोग्य संस्थांमधील वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याकरीता स्वतंत्र निवडमंडळामार्फत पात्र उमेदवारांना समुपदेशनाद्वारे पसंतीच्या ठिकाणी नियुक्ती देण्यात येते. सन २०१५ मध्ये माहे एप्रिल, व सप्टेंबर मध्ये समुपदेशनाद्वारे १३४९ वैद्यकीय अधिकाऱ्यांना नियुक्तीचे आदेश देण्यात आले आहेत. उर्वरित रिक्त पदे भरण्याबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उस्मानाबाद शहरालागत अधिकृत कत्तलखाना उभारणेबाबत**

**(१२) २९२२० (२१-०१-२०१६). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उस्मानाबाद शहराची लोकसंख्या विचारात घेता शहरात अथवा शहरालगत लागणाऱ्या मास विक्रीसाठी एकही अधिकृत कत्तलखाना नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अधीकृत कत्तलखाना उभारणी संदर्भात शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०७-२०१६) :**(१), (२) व (३) उस्मानाबाद शहरात अधिकृत कत्तलखाना नाही. नवीन कत्तलखाना उभारण्या करीता नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेने ठराव मंजूर केला आहे. कत्तलखाना उभारण्यासाठी गावरान जमीन संपादित करण्यासंदर्भात जिल्हाधिकारी स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

---

**वाशिम जिल्ह्यालगत चिखली रोडवर जिल्हा स्त्री रुग्णालयाच्या**
**इमारतीचे स्लॅब सेंट्रींग कोसळल्याबाबत**

**(१३) २९६९१ (२१-०१-२०१६). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाशिम जिल्ह्यालगत चिखली रोडवर जिल्हा स्त्री रुग्णालयाच्या इमारतीचे काम सुरु असून स्लॅब टाकण्यासाठी सेंट्रींग बसविण्याचे काम सुरु असताना अचानक सेंट्रींग खाली कोसळल्याने दिनांक २४ सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हा स्त्री रुग्णालयाच्या इमारतीच्या पहिल्या माळयाचे बांधकाम पूर्ण होण्याआधीच स्लॅबचा एक कोपरा कोसळला असून सदर इमारतीचे बांधकाम हे निकृष्ट दर्जाचे होत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त इमारतीचे बांधकाम करणाऱ्या बिल्डर्सवर व ठेकेदारास शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करणार आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१९-०५-२०१६) :**(१) हे अंशत: खरे आहे.

दिनांक २४ सप्टेंबर, २०१५ रोजी स्त्री रुग्णालयाच्या पोर्चचे काम सुरु होण्याअगोदरच पोर्चच्या एका ठिकाणी स्ट्रटरिंग तुटल्याने अंशत: सेंट्रींग खाली आले होते. कंत्राटदाराने स्वखर्चाने सदर सेंट्रींगचे काम पुनश्च: करुन दिले आहे.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अलिबाग (जि.रायगड) जिल्हा सामान्य रुग्णालय परिचारिका निवासस्थानाच्या नुतनीकरणाचे काम करण्याबाबत

**(१४) २९९९८ (२१-०१-२०१६). श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.जीवा गावित (कळवण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अलिबाग (जि.रायगड) जिल्हा सामान्य रुग्णालय परिचारिका निवासस्थानाच्या नुतनीकरणाचे काम हाती घेण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, परिचारिकांच्या निवासस्थानांच्या नुतनीकरणासाठी निधी उपलब्ध न झाल्याने काम अर्धवट स्थितीत करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निवासस्थानासाठी शासन तातडीने निधी उपलब्ध करण्यासाठी कोणती उपाययोजना करण्यात येणार आहे ?

**डॉ. दीपक सावंत (०९-०५-२०१६) :**(१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही. परिचारीकांच्या निवासस्थानाच्या नुतनीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले असून कामाच्या पूर्णत्वाचा दाखला दि. २८.१०.१५ रोजी प्राप्त झालेला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात बहुतांशी रुग्णवाहिका चालकांकडून आकारल्या जाणाऱ्या दराबाबत रुग्ण व नातेवाईकांची अडवणूक होत असल्याबाबत**

**(१५) ३००९२ (२१-०१-२०१६). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात बहुतांशी रुग्णवाहिका चालकांकडून आकारल्या जाणाऱ्या दराबाबत रुग्ण व नातेवाईकांची अडवणूक होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील अनेक जिल्ह्यामध्ये शेकडो रुग्णवाहिका हॉस्पिटलसमोर उभ्या असतात अनेकवेळा हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक सोयी सुविधा उपलब्ध नसल्याने एम.आर.आय, सिटी स्कॅन व इतर काही चाचण्यासाठी इतर ठिकाणी जाण्याची गरज भासते त्यावेळी सदरहू रुग्णवाहिका चालक रुग्णाच्या नातेवाईकांची आर्थिक लूट करतात याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१९-०५-२०१६) :**(१) असे निदर्शनास आलेले नाही.

(२) व (३) शासन निर्णय क्रमांक जिरुफी १०.००/प्र.क्र.९०/२०००/आरोग्य३, दिनांक १०/०७/२००१ अन्वये शासकीय रुग्णालयातून रुग्ण संदर्भित करण्यासाठी रुग्णवाहिका शुल्क रु.५/- प्रति कि.मी. एवढे दर निश्चित करण्यात आले होते. दिनांक २८/१२/२०१५ पासून त्यात रु. १५/- प्रति कि.मी. व प्रतिक्षा शुल्क, आठ तासांच्या पुढे प्रतितास रु. ७५/- असे निश्तित केले आहे. यातून पिवळे रेशनकार्ड धारक, गरोदर माता वनवजात अर्भकांना विनाशुल्क सेवा पुरविली जाते.

---

**ओढानागनाथ (जि. हिंगोली) तालुक्यातील अंजनवाडी गावात विविध साथीच्या रोगाची होत असलेली लागण**

**(१६) ३०१४८ (१६-०१-२०१६). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औढानागनाथ (जि.हिंगोली) तालुक्यातील अंजनवाडी गावात नेहमीच विविध साथीच्या रोगाची लागण सुरुच असून सदरहू रुग्णालयात उपचार वेळेवर मिळत नाहीत तसेच वारंवार दुषीत पिण्याच्या पाणी पुरवठा करण्यात येत असल्याचे या साथीला आळा घालण्यास संबंधिताना अपयश येत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंजनवाडी गावातील ग्रामस्थांना शुध्द पिण्याचा पाण्याचा पुरवठा होण्याबाबत तसेच सुरु असलेल्या विविध साथीच्या रोगाने आळा घालण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात यत आहे,
(३) अद्याप उपाययोजना केली नसल्यास, होणा-या विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१८-०५-२०१६) :**(१) हे अंशत: खरे आहे.

सदर गावात सध्या कोणत्याही रोगाची लागण नाही. परंतु माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये अतिसाराचे एकूण ३२ रुग्ण आढळून आले होते. त्यांचेवर तातडीने औंढा नागनाथ येथील ग्रामीण रुग्णालयात उपचार करण्यात आले असून त्याच महिन्यात साथ आटोक्यात आली.
(२) सदरची लागण ही हातपंपाचे दुषित पाणी पिण्यामुळे झाली होती. त्याबाबत ग्रामपंचायतने वेळीच पाणी शुध्दीकरणाची कार्यवाही केल्यानंतर सर्व पाणी स्त्रोताचे पाणी नमुने प्रयोगशाळेमार्फत तपासणी अंती योग्य आलेले आहेत. सध्या त्या-त्या गावात नियमित पाणी गुणवत्ता नियंत्रण करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्हयातील पाटोदा येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या**
**बाहेरील पोर्चच्या छताचा भाग कोसळल्याबाबत**

**(१७) ३०१७३ (२१-०१-२०१६). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्हयातील पाटोदा येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या शासनाने धोकादायक ठरविलेल्या इमारतीतील शस्त्रक्रिया बाहेरील पोर्चच्या छताचा काही भाग कोसळला असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येथे नवीन इमारतीच्या प्रस्ताव मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप उपाययोजना केली नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१९-०५-२०१६) :**(१) हे खरे आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्र पाटोदा येथील इमारती बाहेरील पोर्चच्या छताचे प्लास्टरचा पोपडा खाली पडलेला असल्याबाबत तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती, येवला यांनी कळविलेले आहे.
(२) प्राथमिक आरोग्य केंद्र पाटोदा, ता.येवला जुनी मुख्य इमारत निर्लेखित करुन नविन इमारत बांधण्याबाबत जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेवर मंजूरी घेण्याबाबतची कार्यवाही प्रस्तावित आहे.

(३) सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात बिगर आदिवासी क्षेत्रांतर्गत नविन प्रा.आ.केंद्र बांधकाम करण्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध नसल्याने सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात सदर इमारतीचे बांधकाम काम घेण्यात आलेले नाही. तरी सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात निधी उपलब्ध झाल्यानंतर नविन इमारत बांधकाम करण्याबाबतची कार्यवाही नियोजित आहे.

---

**उरण तालुक्यातील अद्ययावत हॉस्पिटल (मल्टी स्पेशालिटी) उभारण्याच्या मागणीसंदर्भात**

**(१८) ३०६०२ (१६-०१-२०१६). श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण तालुक्यातील अद्ययावत हॉस्पिटल (मल्टी स्पेशालिटी) उभारण्याच्या मागणीसंदर्भात उरण सामाजिक संस्था, उरण, (जि.रायगड) यांनी दिनांक १५ सप्टेंबर, २०१५ रोजीच्या सुमारास प्रधान सचिव, आरोग्य विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडे एक लेखी निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीकरिता दिनांक २ ऑक्टोबर, २०१५ रोजीच्या सुमारात द्रोणागिरी नोड, उरण, वाहतूक पोलिस चौकी समारे आंदोलन केले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या मागणीसंदर्भात शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्यांचे स्वरुप काय आहे,

(४) अद्याप कोणताच निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१८-०५-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही, लेखी निवेदनात दि २.१०.१५ रोजी द्रोणागिरी नोड, उरण, वाहतूक पोलिस चौकी समोर सत्याग्रहाचा अवलंब करीत असल्याचे नमूद केले असले तरी प्रत्यक्षात आंदोलन झालेले नाही.

(३) शासन निर्णय दि.१७.१.१३ अन्वये राज्यात आरोग्य संस्था स्थापनेचा बृहत आराखड्यास शासन मान्यता दिलेली आहे. त्यामध्ये ३० खाटांच्या उरण ग्रामीण रुग्णालयाचे १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करण्यास मान्यता दिलेली आहे. सदर रुग्णालयाच्या बांधकामासाठी सिडकोकडून ६० वर्षाच्या भाडेपट्टीवर जागा उपलब्ध करुन घेण्यात आलेली आहे. त्यासाठी आकारण्यात आलेली रककम रु. ८४,१४,०००/- यास व या रक्कमेच्या १० % अनामत रक्कम सिडकोस प्रदान करण्यास दि.९.२.२०१६ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राज्यात नेत्रदानाबाबतच्या जनजागृतीसाठी नेत्रदान पंधरवडा साजरा करण्यात आल्याबाबत

**(१९) ३१७७१ (१६-०१-२०१६). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नेत्रदानाबाबतच्या जनजागृतीसाठी दिनांक २५ ऑगस्ट ते दिनांक ८ सप्टेंबर, २०१५ हा कालावधी नेत्रदान पंधरवडा म्हणून साजरा करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लोकांमध्ये नेत्रदानाबाबत जागृतीसाठी शासन पातळीवरील उदासीनता आणि राज्यातील नेत्रपेढ्यामध्ये समन्वयाचा प्रस्ताव असल्याने ही मोहिम प्रभावीपणे राबविली गेली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात लोकांमध्ये नेत्रदानाबाबत जागृती करण्यासाठी शासनामार्फत कोणकोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१८-०५-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

या पंधरवड्यात ६०६४४ लोकांनी मरणोत्तर नेत्रदानासाठी संमतीपत्र सादर केले आहेत. तसेच उपरोक्त काळात राज्यात १४८ नेत्र बुब्बुळे जमा करण्यात आली.

(३) सर्व जिल्हा रुग्णालयामध्ये नेत्रदान समुपदेशक या कंत्राटी पदांची नियुक्ती करण्यात आली आहे. नेत्रदान समुपदेशकांद्वारे मृत व्यक्तींच्या नातेवाईकांना नेत्रदानाबद्दल सर्वकष माहिती देण्यात येऊन त्यांना नेत्रदानास प्रवृत्त करण्यात येते.

नेत्रदान पंधरवडा कालावधीत जिल्हा स्तरावर नेत्रदानाबाबत जनजागृती करण्याकरीता रॅली, पोस्टर प्रदर्शन, पथनाट्य, निबंध स्पर्धा आकाशवाणी केंद्रावर स्थानक भाषेतून नेत्रदानाबाबत माहिती प्रसारण घोषवाक्य स्पर्धा, स्थानिक दूरदर्शक चॅनेलवर नेत्रदान संदेशाचे प्रसारण इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

---

### कोल्हापूर जिल्ह्यातील वन मजुरांच्या निवृत्ती वेतनाचा प्रश्न शासनाकडे प्रलंबित असल्याबाबत

**(२०) ३२५६० (१३-०१-२०१६). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील वन मजुरांच्या निवृत्ती वेतनाचा प्रश्न शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रस्तावावर अंतीम निर्णय झाला आहे काय,

(३) असल्यास, जिल्हयातील वन मजुरांचा निवृत्ती वेतनाचा प्रश्न निकाली काढणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३०-०७-२०१६) :**(१), (२) व (३) शासन निर्णय दिनांक ३१.१.१९९६ नुसार वनमजूरांच्या ५४ निवृत्ती प्रकरणापैकी आश्वासीत प्रगती योजनेचा लाभ सेवानिृत्ती नंतर मिळालेल्या वनमजूरांचीसंख्या २० आहे. सदर मजूरांची मुळ सेवानिवृत्ती प्रकरणे महालेखापाल यांचेकडून मंजूर झालेली आहे. त्यापैकी ४ वनमजूरांची सुधारीत सेवानिवृत्ती प्रकरणे महालेखापाल, मुंबई यांचेकडे पाठविण्यात आली आहेत. एकूण १४ कुटूंब निवृत्ती प्रकरणापैकी ४ वनमजूर मृत आहेत. त्यांनादेखील मृत्यू दिनांकापूर्वी दिनांक १.१.२००६ रोजी आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळाल्यामुळे सुधारित निवृत्ती प्रकरण महालेखापाल, मुंबई यांचेकडे पाठविण्यात आली आहेत.

५४ सेवानिवृत्ती प्रकरणापैकी १७ सेवानिवृत्ती प्रकरणी ही उपवनसंरक्षक, कोल्हापूर वनविभागातील ७५ अनियमितता झालेल्या प्रकरणातील आहेत. ५ कुटुंब निवृत्त प्रकरणाशी संबंधित आहेत. ७५ वनमजूरांपैकी १७ वनमजूरांची सेवानिवृत्ती प्रकरणे व ५ मयत वनमजूरांची कुटुंब निवृत्ती प्रकरणे महालेखाकार यांचेकडे सादर करणेबाबत कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाळूज (जि.औरंगाबाद) ऑद्योगिक क्षेत्रातील ईएसआय कामगारांना सदरील डायग्नोस्टिक सेंटरचा लाभ तातडीने मिळण्याबाबत**

**(२१) ३३१९९ (२१-०१-२०१६). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाळूज (जि.औरंगाबाद) औद्योगिक क्षेत्रातील कामगारांना आरोग्य सुविधा देण्यासाठी ३ वर्षापूर्वी उभारलेल्या डायग्नोस्टिक सेंटरची भव्य इमारत उभारण्यात येऊनही अद्यापपर्यत येथे कोणतीही आरोग्य यंत्रसामुग्री बसविण्यात आलेली नसल्यामुळे ईएसआय कामगार लाभार्थ्यांना याच कोणताच फायदा होत नसल्याचे दिनांक १४ सप्टेंबर, २०१५ मध्ये वा दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती ईएसआय कामगारांना सदरील डायग्नोस्टिक सेंटरचा लाभ तातडीने मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करणार आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१८-०५-२०१६) :**(१) राकावि महामंडळ आदर्श सेवा दवाखाना व निदान केंद्र वाळूंज (जि.औरंगाबाद) (ESIC MODEL DESPENSARY & DIAGNOSTIC CENTER) (MDDC) हे डायग्नोस्टिक सेंटर केंद्र शासनाच्या श्रम व रोजगार मंत्रालय यांच्या अधिपत्याखालील राकावि महामंडळ नवी दिल्ली यांच्या अखत्यारितील आहे. सदर डायग्नोस्टीक सेंटरचे उदघाटन दि. १४/९/२०१५ रोजी झाले असून माहे सप्टेंबर, मध्ये Calorimeter, Microscope, Autoclave, Resuscitation Kit I Glucometer ही ५

वैद्यकीय उपकरणे स्थापित केली आहेत. तसेच Hemoglobin, Malaria Antivenin, Dengue Test, Blood Sugar I Pregnancy Test या तपासण्या सदर सेंटरमध्ये करण्यात येत आहेत.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पिरबावडा (ता.फुलंब्री, जि.औरंगाबाद) येथे पाटबंधारे सिंचन विभागामार्फत नाल्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(२२) ३३२२४ (२०-०१-२०१६). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद जिल्ह्यातील फुलंब्री तालुक्यातील पिरबावडा येथे पाटबंधारे सिंचन विभागामार्फत एकाच नाल्यावर काही सिमेंट बांध तयार होत असून निकृष्ट साहित्य व अंदाजपत्रकास दुर्लक्ष करुन हे कामे होत आहे त्यामुळे या निकृष्ट कामाची तात्काळ चौकशी करावी अशी पिरबावडा ग्रामस्थांसह ग्रा.प. सदस्यांनी केली असल्याचे माहे मे-२०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शासनाने सदर निकृष्ट कामाची चौकशी करुन संबंधित ठेकेदारावर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०५-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
पिरबावडा ग्रामस्थांसह ग्रामपंचायत सदस्यांनी दि. २५ मे २०१५ रोजी कार्यकारी अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) विभाग, औरंगाबाद कार्यालयाकडे तक्रार केली आहे.
(२) पिरबावडा येथील सिमेंट नाला बांध क्र. ९ व ११ चे कामे दि. ७/७/२०१५ रोजी पूर्ण करण्यात आली आहेत. सदर कामांचे चाचणी निष्कर्ष हे निविदा शर्तीशी साधर्म्य ठेवून आहेत. सन २०१५ च्या पावसाळ्यात सदर कामे पुर्ण संचय पातळीपर्यंत भरली होती. सिमेंट नाला बांध क्र. १० चे काम सद्यस्थितीत प्रगतिपथावर आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर जिल्ह्यात राजीव गांधी जीवनदायी योजनेतील लाभार्थ्यांच्या देयकांची पडताळणी करण्याबाबत**

**(२३) ३३२३७ (२१-०१-२०१६). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यात खासगी रुग्णालयाने सादर केलेल्या देयकामध्ये सीजीएचएसच्या बाबी नसती तर तसेच यामध्ये अंतर्भूत नसेल तर देय होणार नाहीत सादर केलेल्या देयकामध्ये औषधांची देयके तपासण्यात येऊन देयके आवश्यक होती काय त्याचे दर योग्य होते काय, लाभार्थी राजीव गांधी जीवनदायी योजनेतील लाभार्थी आहे काय याबाबत पडताळणी करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी मुंढे यांनी संबंधितांना दिले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी औषधांची देयके प्रशासनाने तपासली आहेत काय,

(३) असल्यास, त्यात किती बोगस देयके आढळून आली त्यांचेवर काय कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१९-०५-२०१६) :**(१) व (२) नाही.

राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेंतर्गत अंगीकृत रुग्णालयांनी केलेल्या उपचार/शस्त्रक्रियांची देयके ऑनलाईन पध्दतीने विमा कंपनीकडे सादर केली जातात. त्यानंतर विमा कंपनीमार्फत त्यांची छाननी करुन सदर देयके मंजुर अथवा नामंजुर केली जातात. त्यामुळे प्रशासनाने देयके तपासण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अमरावती जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र आणि उपकेंद्राची संख्या २० टक्कयांनी कमी झाल्याबाबत

**(२४) ३३४४७ (१६-०१-२०१६). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र आणि उपकेंद्राची संख्या २० टक्कयांनी कमी झाल्याचे जुलै, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामीण भागात डॉक्टरांची कमतरता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने गरीब गरजू रुग्णांसाठी आरोग्य केंद्रांची पुरेशी निर्मिती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१९-०५-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

गट-अ वैद्यकिय अधिकारी मंजूर पदे १२० असून भरलेली पदे १०८ आहे. व रिक्त पदे १२ आहेत. गट-ब वैद्यकिय अधिकारी मंजूर पदे ११० असून भरलेली पदे १०१ व रिक्त पदे ९ आहेत.

(३) शासन निर्णय दिनांक १७/१/२०१३ व ९/६/२०१४ अन्वये अमरावती जिल्ह्यामध्ये एकूण ३५ उपकेंद्रे, ६ प्राथमिक आरोग्य केंद्रे, २ ट्रामा केअर युनिट, २ ग्रामीण रुग्णालयांचे ३० खाटांवरुन ५० खाटात श्रेणीवर्धन अशा एकूण ४५ आरोग्य संस्था मंजूर करण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्हयातील वाघोली अथवा शिक्रापूर येथे उपजिल्हा रुग्णालय होण्याबाबत**

**(२५) ३३९१७ (२१-०१-२०१६). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील ससून सर्वोपचार रुग्णालयामध्ये उपचार घेण्यासाठी राज्यातून रुग्ण येत असल्याने ससून वर दिवसेंदिवस ताण वाढत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे नगर रस्त्यावरील वाघोली अथवा शिक्रापूर येथे उपजिल्हा रुग्णालय व्हावे अशी अनेक दिवसापासून ग्रामस्थांची मागणी आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, वाघोली अथवा शिक्रापूर येथे उपजिल्हा रुग्णालय होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (१८-०५-२०१६) :**(१) हे खरे आहे, तथापि, पुणे येथे ससून सर्वोपचार रुग्णालयाप्रमाणे, जिल्हा रुग्णालय, औंध व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांचे वाय.सी.एम.हॉस्पीटलमध्ये सर्व सोयीयुक्त अत्यावश्यक आरोग्य सेवा पुरविली जाते.

(२) व (३) पुणे नगर रस्त्यावरील वाघोली अथवा शिक्रापूर येथे उपजिल्हा रुग्णालय व्हावे असे कोणतेही निवेदन अद्यापपर्यंत शासनास प्राप्त झालेले नाही, तथापि, दि. १७/११/२०१५ च्या शासन निर्णयान्वये मौजे शिक्रापूर येथे ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय मंजूर झालेले आहे. तसेच वाघोली पासून ५ कि.मी. अंतरावर मौजे लोहगाव, ता.हवेली, जि.पुणे येथे १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय दि. १७/१/२०१३ च्या शासन निर्णयान्वये मंजूर झालेले आहे.

---

**रुकडी (ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर) येथे रुग्णालय उभारण्यासंदर्भात**

**(२६) ३४१८२ (१६-०१-२०१६). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रुकडी (ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर) येथे रुग्णालय उभारण्याकरिता दोन वर्षापूर्वी मंजूरी मिळाली असून ४ कोटींचा निधी उपलब्ध करुन देण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्यापही या रुग्णालयाच्या उभारण्याची कार्यवाही होत नसल्याने सदरचा निधी परत जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त तालुक्यातील गावाची लोकसंख्या २५ हजारांच्या घरात असून तेथील नागरिकांना खाजगी रुग्णालयात उपचार घ्यावे लागत असल्याने त्यांचे आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरचे रुग्णालय तातडीेने उभारण्यासंदर्भात शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१८-०५-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.

दि.१७.०१.२०१३ च्या शासन निर्णयान्वये सन २००१ च्या लोकसंख्येवर आधारित राज्यात आरोग्य संस्था स्थापनेच्या बृहत आराखड्यास मान्यता देण्यात आली आहे. यामध्ये रुकडी, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर येथे ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. सदर ३० खाटांच्या मुख्य इमारत बांधकामासाठी दि. २६ जून, २०१३ च्या शासन निर्णयान्वये रु. ४५०.०० लक्ष इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. तथापि, या रुग्णालयाच्या बांधकामासाठी आवश्यक जागा अद्याप उपलब्ध झालेली नसल्यामुळे सदर निधी अद्यापही उपलब्ध करुन देण्यात आलेला नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) हे खरे नाही.

मौजे रुकडी येथे हेर्ले प्राथमिक आरोग्य केंद्राअंतर्गत आरोग्य पथक कार्यरत असून येथे प्रसुती, लसीकरण व इतर आरोग्य सेवा दिल्या जात आहेत. तसेच मौजे रुकडी येथून ९ ते १० कि.मी अंतरावर ग्रामीण रुग्णालय, हातकणंगले हे ३० खाटांचे रुग्णालय कार्यरत आहे. या रुग्णालयामार्फत परिसरातील रुग्णांना सेवा पुरविण्यात येत आहेत.
(४) या रुग्णालयाच्या बांधकामाकरिता आवश्यक जागा उपलबध होताच बांधकामाची कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उल्हासनगर (जि.ठाणे) येथील कॅम्प नंबर चार येथील प्रसूतीगृहाचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(२७) ३४२५३ (२१-०१-२०१६). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उल्हासनगर (जि.ठाणे) येथील कॅम्प नंबर चार येथील प्रसूतीगृहाचे काम दोन वर्षापूर्वी सुरु करुनही अद्याप काम अपूर्ण आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद् नुसार सदर प्रसूतीगृहाचे काम तातडीने करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणती कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१८-०५-२०१६) :**(१), (२) व (३) दि.३०.१०.२०१५ रोजी बांधकाम पूर्ण झालेले आहे. तथापि, बांधकामाची पाहणी केली असता तळमजला व पहिल्या मजल्याच्या नुतनीकरणाच्या काही त्रुटी निदर्शनास आल्या. त्या त्रुटींची पूर्तता तातडीने करुन देण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागा कळविल्यानुसार कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे सावरगांव माळ (ता.सिंदखेडराजा, जि.बुलडाणा) येथील मुक्तीधाम मंदिराच्या बाजूला सुरु असलेल्या तलावाचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे होत असल्याबाबतची तक्रार**

**(२८) ३४२७३ (१२-०१-२०१६). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे सावरगांव माळ (ता.सिंदखेडराजा, जि.बुलडाणा) येथील मुक्तीधाम मंदिराच्या बाजूला सुरु असलेल्या तलावाचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे होत असल्याबाबतची तक्रार विभागीय अधिकारी, जि.प सिंचन विभाग, बुलडाणा यांच्याकडे स्थानिक ग्रामस्थांनी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) उक्त कामामध्ये योग्य दर्जाचे मटेरिअर वापरण्यात आलेले नसून शासनाच्या अंदाजपत्रकाप्रमाणे काम करण्यात येत नसल्याचे तसेच कामामध्ये काळ्या मातीऐवजी जागीच पडलेला मुरुम टाकण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कामाची विभागीय अधिकारी, यांनी चौकशी केली आहे काय त्यात काय आढळून आले,
(४) तद्नुसार यास जबाबदार असणाऱ्या व्यक्तींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२०-०५-२०१६) :**(१) होय.

कार्यकारी अभियंता, सिंचन विभाग, जिल्हा परिषद, बुलडाणा यांचे कार्यालयास शहर प्रमुख, मातृतिर्थ सिंदखेड राजा यांच्या दिनांक २१ सप्टेंबर, २०१५ च्या पत्रान्वये याबाबतची तक्रार प्राप्त झालेली आहे,
(२) नाही.

अंदाजपत्रकातील तरतुदीनुसार व विनिर्दिष्ठाप्रमाणे (माणके प्रमाण) काम करण्यात आलेले आहे.

(३) सदर कामाची उपविभागीय अधिकारी, जिल्हा परिषद सिंचन उपविभाग, देऊळगांव राजा यांनी दिनांक २२/९/२०१५ रोजी मोकास्थळी पाहणी करुन त्यांनी त्यांचे अहवालामध्ये काम अंदाजपत्रकाप्रमाणे झाल्याचे नमूद केले आहे, ज्या उपाययोजनांसाठी अंदाजपत्रकामध्ये बाबींची तरतुद करण्यात आली होती त्या बाबींचा उद्देश सफल झाल्याचे अहवालात नमूद केले आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयात अवघे वीसच्या आसपास मानसोपचार तज्ञ असल्याबाबत**

**(२९) ३५२४६ (२१-०१-२०१६). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देशात मानसोपचारतज्ञांची संख्या केवळ पाच हजारांच्या घरात असून कोल्हापूर जिल्हयात अवघे वीसच्या आसपास मानसोपचार तज्ञांची संख्या आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सध्याची जीवनशैली तसेच स्पर्धेमुळे ताणतणाव वाढत असल्याने मनोरुग्णांचा टक्का वाढत असल्याने मानसोपचार तज्ञांची संख्या वाढविण्याकरिता शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, त्याचे स्वरुप काय आहे ?

**डॉ. दीपक सावंत (१८-०५-२०१६) :**(१) होय.
(२) व (३) शासनामार्फत सेंटर ऑफ एक्सलंन्स अंतर्गत फेज-२ मध्ये पुणे व नागपूर येथे सायकॅट्रीक पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्याची कार्यवाही सुरु आहे. सीपीएस (कॉलेज ऑफ फिजीशिएन ॲन्ड सर्जन) अंतर्गत प्रादेशिक मनोरुग्णालय, नागपूर येथे पदविका अभ्यासक्रम सुरु करण्यात आला आहे. तसेच चिकित्सालयीन मानसशास्त्र, मनोविकार सामाजिक कार्यकर्ता व मनोविकासतज्ञ परिचारिका हे पदव्युत्तर अभ्यासक्रम प्रादेशिक मनोरुग्णालय, पुणे, ठाणे व नागपूर येथे सुरु करण्यात येणार आहेत.

---

**पालघर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील मनोर रुग्णालयात वैद्यकिय अधिकारी व कर्मचारी उपलब्ध नसल्यामुळे रुग्ण उपचार अभावी वंचीत रहात असल्याबाबत**

**(३०) ३५५२३ (२१-०१-२०१६). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ग्रामीण भागातील आदिवासी रुग्णांसाठी उपयोगी ठरणारे पालघर तालुक्यातील मनोर रुग्णालयात गेल्या कित्येक दिवसापासून एकही वैद्यकीय अधिकारी, नर्स व अन्य वॉर्डबॉय व शिपाई इ. कर्मचारी नसल्यामुळे रुग्णांचे प्रचंड हाल होत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रुग्णालयात ३ डॉक्टर्स, नर्सेस, वॉर्ड बॉय इ. कर्मचाऱ्यांची पदे मंजूर होती परंतू सद्य परिस्थिती गंभीर झालेली असून उपरोक्त पदावरील कर्मचारीविना रुग्णालय ओस पडले आहे ही वस्तुस्थिती खरी आहे काय,
(३) असल्यास, ग्रामीण भागातील आदिवासींना चांगल्या प्रकारची दर्जेदार आरोग्य सेवा मिळण्याकरिता शासन कोणती उपाययोजना करणार आहे व उपरोक्त प्रकाराची सखोल चौकशी करण्यात येऊन जबाबदार असणाऱ्या संबंधितावर चौकशीअंती कोणती कारवाई करण्यात येणार आहे ?

**डॉ. दीपक सावंत (१९-०५-२०१६) :**(१) व (२) हे खरे नाही.

ग्रामीण रुग्णालय, मनोर, जि.पालघर येथे २६ पदे मंजूर असून १९ पदे भरलेली आहेत व ७ पदे रिक्त आहेत. याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे:-

| अ.क्र. | पदनाम | मंजूर | भरलेली |
|---|---|---|---|
| **(१)** | वैद्यकिय अधिक्षक | १ | ० |
| **(२)** | वैद्यकीय अधिकारी | ३ | ३ |
| **(३)** | सहायक अधिक्षक | १ | १ |
| **(४)** | कनिष्ठ लिपिक | २ | १ |
| **(५)** | वाहनचालक | १ | १ |
| **(६)** | अधिपरिचारीका | ७ | ७ |
| **(७)** | औषध निर्माण अधिकारी | १ | ० |
| **(८)** | क्ष-किरण तंत्रज्ञ | १ | ० |
| **(९)** | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | १ | १ |
| **(१०)** | प्रयोगशाळा सहायक | १ | १ |
| **(११)** | कक्षसेवक | ४ | २ |
| **(१२)** | शिपाई | १ | ० |
| **(१३)** | सफाईगार | २ | २ |
| | **एकूण** | **२६** | **१९** |

वैद्यकीय अधिक्षकाच्या रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार वैद्यकीय अधिकारी गट-अ यांच्याकडे दिलेला आहे. उपलब्ध अधिकारी गट-अ यांच्याकडे दिलेला आहे. उपलब्ध अधिकारी/कर्मचाऱ्यांमार्फत रुग्णांना वेळच्यावेळी रुग्णसेवा पुरविण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मध्यवर्ती रुग्णालय उल्हासनगर ३ येथील प्रस्तावित दुरुस्ती व नवीन इमारतीची कामे तातडीने करण्याबाबत**

**(३१) ३५६०४ (२१-०१-२०१६). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मध्यवर्ती रुग्णालय उल्हासनगर ३ येथील प्रस्तावित दुरुस्ती व नवीन इमारतीची कामे तातडीने करण्याबाबतचे निवेदनाद्वारे मागणी प्रधान सचिव सार्वजनिक विभाग, मंत्रालय ह्यांच्याकडे दिनांक १८ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाच्या वतीने सदर कामे त्वरित करण्यासाठी कोणती उपाययोजना तसेच कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१८-०५-२०१६) :**(१) होय.
(२) सार्वजनिक बांधकम विभागाकडून सदर रुग्णालयाच्या दुरुस्तीचे तथा नवीन इमारतीची कामे करण्याबाबतचे अंदाजपत्रक व आराखडे प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर चालू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यवतमाळ जिल्हयातील घाटंजी तालुक्यात जलयुक्त शिवाराच्या कामात गैरप्रकार झाल्याबाबत**

**(३२) ३५८६९ (१२-०१-२०१६). श्री.मदन येरावार (यवतमाळ) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने शेतकरी आत्महत्या पुर्णतः थांबविण्यासाठी विविध उपायोजना करुन जलयुक्त शिवार अंतर्गत मौजे घाटंजी (जि.यवतमाळ) मध्ये सन २०१४-१५ मध्ये जलयुक्त शिवार अंतर्गत किन्ही, शिरोली, कार्ली यासह अनेक गावांमध्ये कोट्यवधी रुपयांची कामे केली असून सदर कामामध्ये मोठयाप्रमाणात गैरप्रकार झाला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तालुक्यातील जलयुक्त शिवारांतर्गत मंजुर कामे हे नियमबाहय पध्दतीने करण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या कामातील अनेक ठिकाणी ढाळीचे बांध, सिमेंट नाला बांध, गाळ काढणे, लुज बोल्डर, डिप सी सी टी, विहीर पुणभरण तुटफुट दुरुस्तीचे कामात तसेच ढाळीचे कामात सुपिक माती ओढून ठिगारे व सिमेंट प्लग बंधाऱ्याच्या कामात साहित्य निकृष्ट दर्जाचे वापरुन काम करण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, घाटंजी तालुक्यातील या नियमबाहय कामामुळे व संबंधीत कृषी अधिकाऱ्यांच्या दिरंगाईमुळे शासनाच्या निधीचा अपव्यय व जलयुक्त शिवार योजनेचे मुळ धोरण दुर्लक्षीत झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, शासनाकडून वरील प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-०५-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

सन २०१५-१६ मध्ये घाटंजी तालुक्यात जलयुक्त शिवार योजनेंतर्गत २१ गावांची निवड करण्यात आली आहे. या गावांमध्ये शिवार फेरी घेऊन सविस्तर आराखडा तयार करुन त्यास ग्रामसभेची मान्यता घेण्यात आली आहे, तसेच उपविभागीय कृषि अधिकारी यांची तांत्रिक मान्यता घेऊन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचेकडे नोंदणी झालेल्या यंत्रधारकांकडून कामे करुन घेण्यात आली आहेत.
(३) हे खरे नाही.

जलयुक्त शिवार अभियानांतर्गत झालेल्या कामांची तपासणी सर्व पर्यवेक्षकीय अधिकाऱ्यांनी त्यांच्या विहीत टक्केवारीनुसार केलेली आहेत, त्याचप्रमाणे त्रयस्थ संस्था नाबार्डनेही सदर कामांचे मुल्यांकन केलेले आहे. या सर्व स्तरीय मूल्यांकनात कुठेही अनियमितता अथवा गैरप्रकार आढळून आलेला नाही. त्याचप्रमाणे झालेल्या कामात कुठेही तक्रार प्राप्त झालेली नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर जिल्ह्यातील राज्य कामगार विमा रुग्णालय बंद होण्याच्या मार्गावर असल्याबाबत**

**(३३) ३६१६९ (२१-०१-२०१६). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्ह्यातील कामगारांना आरोग्यसेवा देणाऱ्या सोमवार पेठेतील राज्य कामगार विमा रुग्णालय शासनाच्या उदासिनतेमुळे बंद होण्याच्या मार्गावर आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खाजगी केंद्रामधून सुरु असलेले सोनोग्राफी, पॅथॉलॉजी आणि एक्सरेची सोयही बंद केले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, गेल्या अनेक वर्षापासून आकस्मिकरित्या भरती झालेल्या व मृत्युशी झुंज देणाऱ्या रुग्णांवर तसेच प्रसूतीच्या शस्त्रक्रिया ते मोठ्या शस्त्रक्रियांसाठी मेडिकल किंवा खासगी रुग्णालयांची रुग्णांना वाट धरावी लागत आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, कामगारांना आरोग्यसेवा प्रदान करतांना त्यांच्या वेतनातून १.७५ टक्के आणि कंपनी मालकांकडून ४.७५ टक्के रक्कम कपात करण्यात येत आहे काय,
(५) असल्यास, रुग्णालयाच्या विकासाच्या संदर्भाने कार्यवाही केली आहे काय, नसल्यास विलंबनाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१८-०५-२०१६) :**(१) हे खरे नाही

राकावियो रुग्णालय नागपूर मार्फत सन २०१५-१६ मध्ये माहे डिसेंबर पर्यंत ५७,२३२ बाहयरुग्णांना व १५,७२० आंतररुग्णांना उपचार देण्यात आले असून ३२४ लघु, ५२२ मोठया शस्त्रक्रिया व ८१ प्रसुती करण्यात आल्या आहेत.

(२) हे अंशत: खरे आहे.

सदर रुग्णालयातील सोनोग्राफी मशीन जुनी होऊन वारंवार बंद पडत असल्यामुळे खाजगी केंद्रामधून सोनोग्राफी करण्यात येत होत्या. विमारुग्णांनी खाजगी केंद्रामधून सोनोग्राफी करुन घेतल्यास झालेल्या खर्चाची प्रतिपुर्ती करण्यात येते तसेच राज्य कामगार विमा योजना, राज्य कार्यकारी समितीच्या निर्णयानुसार सदर रुग्णालयाकरिता नविन सोनोग्राफी मशिन खरेदी करण्यात येत आहे.

सदर रुग्णालयातील शरीरविकृती शास्त्रज्ञ हे पद व प्रयोगशाळा तंत्रज्ञांची सर्व पदे रिक्त झाल्यामुळे सन २०११ पासुन प्रयोगशाळा बंद ठेवण्यात आली होती. तथापि, बंधपत्रित विशेषज्ञ वैद्यकिय अधिकारी यांची नियुक्ती करण्यात येऊन ऑक्टोबर २०१५ पासुन सदर रुग्णालयातील प्रयोगशाळा सुरु करण्यात आली असून ऑक्टोबर ते डिसेंबर २०१५ या कालावधीत एकूण ४२९४ चाचण्या करण्यात आल्या आहेत.

सदर रुग्णालयातील एक्स-रे मशीन जुनी होऊन वारंवार बंद पडत असल्यामुळे खाजगी केंद्रामधुन एक्स-रे करुन घेण्यात येत होते. तथापि, सदर रुग्णालयाकरिता नवीन एक्स-रे मशीन खरेदी करण्यात आली असून सदर नवीन मशीन बसविण्याकरिता आवश्यक ते बांधकाम पूर्ण करुन घेण्यात आले आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

सदर रुग्णालयातील एकूण मंजूर पदांपैकी ५६ % पदे रिक्त असून विशेषज्ञ, परिचारिका व समवैद्यकीय कर्मचारी यांच्या रिक्त पदांमुळे आकस्मिक सेवा २४ तास पुरविण्यास शक्य होत नाही. आकस्मिक परिस्थितीत रुग्णांस शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे स्थानांतर करुन उपचार पुरविण्यात येत असून रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

(४) होय.

राकावि योजनेअंतर्गत विमाधारकांच्या वेतनाचे १.७५ % व कंपनी मालकांकडुन ४.७५ % अशी एकूण ६.५० % वर्गणी राकावि महामंडळ, श्रम मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्याकडे जमा होते.

(५) होय.

राकावि योजना राज्य कार्यकारी समिती च्या दिनांक २६.११.२०१५ व दिनांक २९.०३.२०१६ रोजी संपन्न झालेल्या अनुक्रमे चौथ्या व पाचव्या बैठकीतील निर्णयानुसार राकावि योजनेतील रिक्त पदे भरण्याबाबत तसेच वैद्यकीय उपकरणे व यंत्रसामुग्री खरेदी करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## पुण्यातील येरवडा येथील रुग्णालयात गेल्या पाच महिन्यात नियम बाह्यपणे प्रवेश दिल्याबाबत

**(३४) ३६२८६ (२१-०१-२०१६). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील येरवडा येथील रुग्णालयात गेल्या पाच महिन्यात नियम बाह्यपणे प्रवेश दिल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार नियमबाह्यरित्या प्रवेश देण्यास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१८-०५-२०१६) :**(१) हे खरे नाही, प्रादेशिक मनोरुग्णालय, येरवडा, पुणे येथे पश्चिम महाराष्ट्रातील एकूण १३ जिल्हयातून १) न्यालयालयामार्फत व २) ऐच्छिक अशा दोन प्रकारे रुग्ण भरती केले जातात.
(२) व (३) पुण्यातील येरवडा येथील मनोरुग्णालयात नियमबाह्य प्रवेशाबाबत दि. १८.०८.२०१५ रोजी वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झालेल्या बातमीस अनुसरुन सदर प्रकरणी चौकशी करण्याकरीता त्रिसदस्यीय समिती नेमण्यात आली होती. समितीच्या अभिप्रायानुसार येरवडा मनोरुग्णालयात नियमबाह्य प्रवेश दिल्याचे दिसून आलेले नाही. त्यामुळे कोणावरही कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवला नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती येथे शासकीय रुग्णवाहिका १०८ च्या सेवेचे पैसे आकारण्यात येत असल्याबाबत**

**(३५) ३६८०० (२१-०१-२०१६). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती येथे शासकीय रुग्णवाहिका १०८ च्या कंत्राटदार एजन्सी मार्फत मोफत रुग्णवाहिका सेवा न पुरविता अवैध मार्गाने पैसे आकारून नागरीकांचे आर्थिक शोषण होत असल्याची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दोषीवर काय कारवाई करण्यात आली आहे किंवा करण्याचे योजिले आहे,
(३) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१९-०५-२०१६) :**(१) हे खरे नाही.
दिनांक ३०/८/२०१५ चे सकाळ मधील बातमीनुसार चौकशी केली असताना त्यामध्ये तथ्य आढळले नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालय येथील सिटी स्कॅन व एमआरआय मशीन बंद असल्याबाबत

**(३६) ३६८२४ (२१-०१-२०१६). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालय येथील सिटी स्कॅन व एमआरआय मशीन बरेच दिवसापासून बंद असल्याने नविन सिटी स्कॅन मशीन उपलब्ध करुन देण्याचा निर्णय शासनस्तरावर घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मशीनची सुविधा केव्हापासून कार्यान्वीत होणार आहे,

(३) नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१८-०५-२०१६) :**(१) जिल्हा रुगणालय, अमरावती करीता नवीन सिटी स्कॅन मशीन उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय.

जिल्हा रुग्णालयांच्या प्रमाणकानुसार जिल्हा रुग्णालय, अमरावती येथे एमआरआय मशीनची सुविधा अनुज्ञेय नाही.

(२) व (३) जिल्हा रुग्णालय, अमरावती करीता नवीन सिटी स्कॅन मशीन उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने आरोग्य सेवा संचालनालयामार्फत निविदा प्रक्रिया करण्यात येऊन दिनांक १४.२.२०१६ रोजी सिटी स्कॅन मशीन खरेदीबाबत पुरवठा आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

---

## जळगाव जिल्ह्यातील उपजिल्हा व ग्रामीण रुग्णालयामध्ये वर्ग १ व वर्ग २ च्या वैदयकीय अधिकाऱ्यांची तब्बल ४७ रिक्त पदे भरणेबाबत

**(३७) ३७७६३ (२१-०१-२०१६). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यातील उपजिल्हा व ग्रामीण रुग्णालयामध्ये वर्ग १ व वर्ग २ च्या वैदयकीय अधिकाऱ्यांची तब्बल ४७ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास यामुळे जिल्ह्यातील ग्रामीण आरोग्य सेवेचे वाताहात झाली असून गोरगरीब जनतेला खाजगी रुग्णालयात जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास सदरची पदे रिक्त असण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (१८-०५-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अमध्ये उपजिल्हा/ग्रामीण रुग्णालयामध्ये एकूण १०० पदे मंजूर आहे. त्यापैकी ६३ पदे भरलेली असून ३७ पदे रिक्त आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) स्वेच्छा सेवानिवृत्ती, बदली, तसेच नामनिर्देशनाने नियुक्ती देऊनही अधिकारी रुजू न होणे इत्यादी कारणांमुळे पदे रिक्त आहेत.

(४) गट-अ मधील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे. जळगाव जिल्ह्यातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे अस्थायी स्वरुपात भरण्याबाबतच्या सूचना दिल्या आहेत.

---

**बी.व्ही.जी. इंडिया प्रा.लि. कंपनीने १०८ रुग्णवाहिकेवरील नियुक्त करण्यात आलेले ई.एम.एम.ओ. (डॉक्टर) व पायलट (ड्रायव्हर) यांचे पी.एफ व अपघात विमा भरला नसल्याबाबत**

**(३८) ३७८८२ (२१-०१-२०१६). डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनास १०८ रुग्णवाहिका सेवा पुरविणाऱ्या बी.व्ही.जी. इंडिया प्रा.लि. कंपनीने १०८ रुग्णवाहिकेवरील नियुक्त करण्यात आलेले ई.एम.एम.ओ. (डॉक्टर) व पायलट (ड्रायव्हर) यांचे पी.एफ व अपघात विमा भरला नाही असे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) कंत्राटी कामगार कायद्याद्वारे मिळणारे किमान वेतनही ही कंपनी कामगारांना देत नाही व देण्यात येणारे वेतनही नियमितपणे देत नाही असे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) सेवा देत असताना शासनाकडून पूर्ण मोबदला घेणाऱ्या या कंपनीने कामगारांच्या मुलभुत हक्काची पायमल्ली केल्याप्रकरणी शासन काय कार्यवाही करणार आहे,

(४) राज्यात कामगारांचे पी.एफ व अपघात विमा न भरणाऱ्या कंपन्यांवर कठोर कार्यवाही करण्याबाबत शासन कोणती उपाययोजना करीत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (१९-०५-२०१६) :**(१) महाराष्ट्र आपत्कालीन वैद्यकिय सेवा प्रकल्पाअंतर्गत असणाऱ्या (१०८) मनुष्यबळा संबधित अपघात विमा भरला आहे. या प्रकल्पाअंतर्गत कार्यरत असणारे मनुष्यबळा संबंधित पी.एफ भरला आहे. परंतु रुग्णवाहिकेवरील कार्यरत असणारे डॉक्टर व ड्रायव्हर Retainer ship basis वर असल्यामुळे पी.एफ लागू होत नाही.

(२) हे खरे नाही.

मे.बी.व्ही.जी.इंडिया प्रा.लि.कंपनी नियमित वेळेत कामगारांना पगार देते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बी.व्ही.जी. इंडिया प्रा.लि. कंपनीने अंतरवासीता पूर्ण न केलेले डॉक्टर (ई.एम.एस.ओ.) नेमल्याबाबत**

**(३९) ३७८८९ (२१-०१-२०१६). डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात १०८ रुग्णवाहिका सेवा पुरविणाऱ्या बी.व्ही.जी. इंडिया प्रा.लि. कंपनीने डॉ.संदीपान कुरमे-नांदेड, डॉ.प्रियंका होळकर-सांगली, जि.पुणे, डॉ.उमेश शेट्टे-चाकण, जि.पुणे, डॉ.देवेंद्र यादव-वाई, जि.सातारा असे अंतरवासीता पूर्ण न केलेले डॉक्टर (ई.एम.एस.ओ). नेमले आहेत असे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) याच प्रकारे राज्यात अंतरवासीता पूर्ण न केलेले अथवा चालू असलेले कितीतरी विद्यार्थी या कंपनीत डॉक्टर (ई.एम.एस.ओ.) म्हणून काम करीत आहे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतची चौकशी करण्यात आलेली आहे काय, यात किती विद्यार्थी अंतरवासीता पूर्ण न केलेले आढळून आले आहेत,

(४) अशा प्रकारे अंतरवासीता पूर्ण न केलेल्या विद्यार्थ्यांना सेवेत सामावून घेण्याचा अधिकारी बी.व्ही.जी इंडिया प्रा.लि. कंपनीस आहे काय याबाबत शासन कोणती कार्यवाही करणार ?

**डॉ. दीपक सावंत (१९-०५-२०१६) :**(१) हे अंशत: खरे आहे.

डॉ.संदीप कुरमे, नांदेड व डॉ.देवेंद्र यादव यांनी मे.बी.व्ही.जी. इंडिया प्रा.लि. येथे व रुग्णवाहिकेवर काम केलेले नाही. डॉ.प्रियंका होळकर-सांगली, डॉ.उमेश शेट्टे-पुणे, अंतरवासीयता पूर्ण केलेली नाही असे निदर्शनास आल्यानंतर तत्काळ त्यांना कार्यमुक्त केलेले आहे.

(२) हे खरे नाही,

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लोहगाव (ता.हवेली, जि.पुणे) येथे शासनाने सन २०१३ च्या बृहत आराखड्यामध्ये १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय उभारण्याबाबत**

**(४०) ३७८९८ (२१-०१-२०१६). श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोहगाव (ता.हवेली, जि.पुणे) येथे शासनाने सन २०१३ च्या बृहत आराखड्यामध्ये १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय उभारण्यासाठी विधानमंडळाच्या पावसाळी अधिवेशनामध्ये १ लक्ष रुपये निधी उपलव्ध करून दिला आहे हे, खरे आहे काय,

(२) असल्यास, उर्वरित १५ कोटी रुपये निधी देऊन हे रुग्णालय तातडीने उभे करणेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१९-०५-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) डिसेंबर, २०१५ च्या हिवाळी अधिवेशनामध्ये रु. २२.८३ लक्ष इतका निधी मंजूर केलेला असून सार्वजनिक बांधकाम विभागाकडून रुग्णालयाचे बांधकाम सुरु करण्याची कार्यवाही चालू आहे.

(३) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

**अकोला जिल्ह्यातील, बोरगाव (मंजु) व चोहट्टा बाजार (ता.अकोला) येथील ग्रामीण रुग्णालयास शासनाने मंजुरी दिल्याबाबत**

**(४१) ३८४५३ (१६-०१-२०१६). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील, बोरगाव (मंजु) व चोहट्टा बाजार (ता.अकोला) येथील ग्रामीण रुग्णालयास शासनाने मंजुरी दिलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ग्रामीण रुग्णालयांचे बांधकामासाठी मात्र स्थानिक सार्वजनिक आरोग्य खात्याचे प्रशासनाकडून दिरंगाई होत असल्याने लोकांना स्वास्थ सेवा मिळण्यास विलंब होत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, दिरंगाई व विलंबास कारणीभुत असणा-या अधिका-यांवर शासन काय कारवाई करणार आहे,

(४) असल्यास, उक्त रुग्णालयांचे प्रलंबित बांधकाम सुरु करण्यासाठी शासन काय करणार आहे ?

**डॉ. दीपक सावंत (१९-०५-२०१६) :**(१) हे अंशत: खरे आहे.

बोरगाव (मंजु) येथे ग्रामीण रुग्णालयास शासनाने दि. १७/१/२०१३ रोजी मंजुरी दिलेली आहे. तथापि चोहट्टा बाजार येथे ग्रामीण रुग्णालयास मंजूरी नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

---

**बीड जिल्हा रुग्णालयाच्या वाढीव २०० खाटांच्या इमारतीसाठी जागा उपलब्ध होत नसल्याबाबत**

**(४२) ३९५९५ (२१-०१-२०१६). श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हा रुग्णालयास वाढीव २०० खाटांना मंजुरी मिळून १ वर्ष पूर्ण होत असून यासाठी लागणारी जागा उपलब्ध होत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या वाढीव २०० खाटांसाठी नवीन इमारत बांधण्यासाठी ९ हजार चौरस मीटर जागेची गरज असताना राज्याच्या गृह विभागाकडून दोन हजार चौरस जागा उपलब्ध करुन देणेबाबत प्रस्ताव या अपुऱ्या जागेमुळे २०० खाटांची इमारत पूर्ण होऊ शकत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, २०० खाटांच्या नवीन इमारतीसाठी जागा उपलब्ध करुन देण्यासाठी शासन कोणती कार्यवाही करणार आहे ?

**डॉ. दीपक सावंत (१८-०५-२०१६) :**(१) हे खरे आहे.
(२) व (३) या रुग्णालयानजीकच्या गृह विभागाच्या उपलब्ध ७१८० चौ.मी. जागेपैकी त्या विभागाची प्रस्तावति बांधकामे वगळता २६६४ चौ.मी. इतकी जागा रुग्णालयाच्या बांधकामासाठी देणे शक्य असल्याचे अभिप्राय पोलीस अधिकक्षक, बीड यांनी गृह विभागास सादर केले आहेत. या जागेत रुग्णालयाचे बांधकाम शक्य नसल्याने अन्य पर्यायी जागा उपलबध करुन घेण्याबाबत प्रयत्न करण्यात येत आहेत.

---

**बीड जिल्हयातील सुमारे १७४ कोल्हापूरी पध्दतीच्या बंधाऱ्यांना दरवाजे नसल्याबाबत**

**(४३) ३९६०६ (२१-०१-२०१६). श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सन १९९५ ते २००२ या कालावधीत बीड जिल्हयात बांधण्यात आलेल्या ३४७ कोल्हापूरी पध्दतीच्या बंधाऱ्यांना दरवाजे बसवून त्याची दुरुस्ती करण्याचा ३७ कोटी रुपयांचा प्रस्ताव जिल्हा परिषद, बीड यांचेकडून शासनास सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त बंधाऱ्यांना दरवाजे नसल्यामुळे सुमारे ८४४.१५ दशलक्ष घनफूट पाणी वाहून जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हयातील सततची टंचाई व दुष्काळ परिस्थिती लक्षात घेवू जिल्हा परिषद, बीड यांनी पाठविलेल्या प्रस्तावास मंजूरी देण्याची कार्यवाही शासन करणार आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रस्तावास मंजूरी देण्यासाठी झालेल्या विलंबाची कारणे कोणती ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१७-०५-२०१६) :**(१) होय हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) व (४) मुख्य कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, बीड यांनी सादर केलेल्या निधी मागणी प्रस्तावामध्ये त्रुटी असल्यामुळे शासन परिपत्रक दिनांक ७/११/२०१३ प्रमाणे दुरुस्ती कामांची काटेकोर तपासणी करण्याच्या सूचना देण्यात आल्यामुळे त्यांचेकडून पुढील कार्यवाही सुरु आहे. त्यास अनुसरुन परिपुर्ण निधी मागणी प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर निधी उपलब्धतेनुसार पुढील कार्यवाहीचे नियोजन आहे.

---

### कोल्हापूर जिल्ह्यामध्ये अंगणवाड्यांमध्ये पुरवल्या जाणाऱ्या निकृष्ट दर्जाच्या पोषण आहाराबाबत

**(४४) ३९९४९ (३०-०४-२०१६). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यामध्ये अंगणवाड्यांच्या माध्यमातून (टी.एच.आर) पोषण आहार घरपोच पुरविला जातो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ० ते ३ वर्षाच्या मुलांना व गरोदर मातांना देण्यात आलेला पोषण आहार निकृष्ट दर्जाचा असल्याने तो जनावरांना देण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त पोषण आहार पुरविणाऱ्या ठेकेदारावर व संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०२-०६-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### पनवेल तालुक्यातील (जि.रायगड) खारघर टेकडीवरील आदिवासी पाडे अद्याप गॅस सिलेंडर पासून वंचित असल्याबाबत

**(४५) ४०८७३ (०७-०५-२०१६). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल तालुक्यातील (जि.रायगड) खारघर टेकडीवर असलेल्या फणसवाडी व चाफेवाडी आदिवासी पाड्यातील आदिवासींच्या प्रत्येक कुटुंबाला वनविभागाकडून आश्वासन देऊनसुद्धा अद्यापही गॅस सिलेंडर दिला गेला नसल्याचे माहे जानेवारी २०१६ वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दोन्ही पाड्यांचे सर्वेक्षण करून गॅस सिलेंडर देण्याचा प्रस्तावही शासनाकडून मंजूर झाला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, वृक्ष तोडीपासून पर्यावरणाचा होणारा ऱ्हास लक्षात घेता पर्यावरणाचे रक्षण करण्यात यावे हा उद्देश ठेऊन आदिवासी पाड्यांना गॅस सिलेंडर देण्यात येणार होते, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, आदिवासींचे आरोग्य लक्षात घेता धुरापासून सुटका करण्यासाठी शासनाने चौकशी करून तातडीने गॅस सिलेंडर देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करीत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०४-०६-२०१६) :**(१), (२), (३) व (४) जळाऊ लाकडावरील अवलंबित्व कमी करण्यासाठी तसेच धुरांमुळे महिलांच्या आरोग्यावर होणारे वाईट परिणाम रोखण्यासाठी महसूल व वन विभाग, शासन निर्णय, क्र.एफडीएम-२०१२/प्र.क्र.४/फ-२,दि.१०.०७.२०१२ अन्वये संरक्षित वनांच्या लगत असलेल्या संयुक्त वनव्यवस्थापन समितीच्या सदस्यांना व ग्रामस्थांना सवलतीच्या दराने (७५ टक्के अनुदान) स्वयंपाकाचा गॅस पुरवठा करण्यात येतो. या अनुषंगाने सन २०१४-१५ मध्ये मौजे फणसेवाडी, चाफेवाडी, हेदोरावाडी व बैलपाडावाडी येथील आदिवासी लाभार्थ्यांना सवलतीच्या दराने LPG गॅस कनेक्शन खरेदीसाठी ७५ टक्के प्रमाणे रक्कम रु. ६.०० लक्ष फक्त संयुक्त वनव्यवस्थापन समिती, खारघर वनक्षेत्र, पनवेल यांच्या सरकारी बचत खात्यात जमा करण्यात आली होती. सदर LPG गॅस कनेक्शन करिता संबंधित लाभार्थ्यांनी उर्वरित २५ टक्के रक्कम भरणे आवश्यक होते. यासंदर्भात समितीच्या सचिवांनी आदिवासी लाभार्थ्यांची दि.१८.०३.२०१५ रोजी सभा घेवून त्यांना २५ टक्के रक्कम भरणा करण्यास सांगितले होते. तथापि, सदर लाभार्थ्यांनी प्रस्तूत रक्कमेचा भरणा न केल्याने त्यांना गॅस कनेक्शन देण्यात आले नाहीत. तथापि, खारघर ग्रामपंचायती मार्फत ग्रामपंचायतीकडे विकास कामांसाठी जमा असलेला ग्रामनिधी अंतर्गत १५ टक्के मागासवर्गीय निधीमधून सदर ८९ आदिवासी लाभार्थ्यांना दि. ९/४/२०१६ रोजी मोफत गॅस कनेक्शन सिलेंडर वितरीत करण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नांदेड जिल्ह्यातील श्री.खंडोबा (श्री.म्हाळसाकांत) मंदिर घुंगराळ येथे वनपर्यटनाचा विकासासाठी नियोजनबध्द आराखडा

**(४६) ४२८१८ (०७-०५-२०१६). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील श्री.खंडोबा (श्री.म्हाळसाकांत) मंदिर घुंगराळ येथे वनपर्यटन, निसर्ग पर्यटनस्थळाचा दर्जा देण्याच्या दृष्टीने व या तीर्थक्षेत्रा, तीर्थस्थळ व वनपर्यटनाच्या विकासासाठी नियोजनबध्द आराखडा तयार करण्याच्या अनुषंगाने वन विभागाच्या वतीने चाचणी करण्यात आली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी वनविभागाने चाचणी पुर्ण केली अथवा नाही,

(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०४-०६-२०१६) :**(१) व (२) सदरहू पर्यटन स्थळाचा विकास करण्याच्या अनुषंगाने माहे जानेवारी २०१६ मध्ये उपवनसंरक्षक, नांदेड व सहाय्यक वनसंरक्षक (तेंदु व कॅम्पा) नांदेड यांनी प्राथमिक चाचणी/पहाणी केलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत देशातील सर्वाधिक २०० जिल्हयाच्या यादीत महाराष्ट्रातील २० जिल्हयांची नांवे यादीत असल्याबाबत**

**(४७) ४५६३६ (३०-०४-२०१६). श्री.विजय औटी (पारनेर), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महिला व बालविकास मंत्रालयाच्या एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत देशातील सर्वाधिक २०० जिल्हयाच्या यादीत महाराष्ट्रातील २० जिल्हयांची नांवे यादीत असल्याचे दिनांक २६ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच गत ५ वर्षात पोषण आहारावर सुमारे ४८५५ कोटी रुपये खर्च करुनही राज्यात ० ते ६ वर्षे वयोगटातील ७० हजार बालकांचा मृत्यु झाल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) बाबत यादीत कोणकोणत्या जिल्हयाचा समावेश आहे,

(४) असल्यास, कुपोषणाचे प्रमाण कमी न होण्याची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०१-०६-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

मासिक प्रगती अहवालावरुन एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत अंगणवाडी कार्यक्षेत्रातील बालकांचे मागील पाच वर्षात झालेल्या बालमृत्यूची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

| कालावधी | एकूण जिवंत जन्म | ०-१ वर्ष बालमृत्यू | IMR | १-६ वर्षे मृत्यू |
|---|---|---|---|---|
| मार्च २०११ | ७४०७७ | १२६६ | १७ | ३६८ |
| मार्च २०१२ | ८५४६१ | १४२६ | १७ | ३८४ |
| मार्च २०१३ | ८५५३३ | १२७७ | १५ | ३०८ |
| मार्च २०१४ | ७६४३७ | ११९१ | १५ | ३१० |
| मार्च २०१५ | ७८२६३ | ९११ | १२ | २४६ |
| **एकूण** | **३९९७७१** | **६०७१** | **--** | **१६१६** |

वरील तपशिलावरुन बालमृत्यूचे प्रमाण कमी होत असल्याचे दिसून येते.

(३) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत देशातील २०० जिल्हयांच्या यादीत राज्यातील अहमदनगर, अमरावती, बीड, बुलढाणा, चंद्रपूर, धुळे, गडचिरोली, गोंदिया, हिंगोली, जळगाव, जालना, नागपूर, नांदेड, नंदुरबार, नाशिक, परभणी, सांगली, वर्धा, वाशिम, मुंबई या २० जिल्यांचा समावेश आहेत.

(४) कुपोषणाचे प्रमाणे कमी न होण्याची कारणे खालील आहेत:-

- दुषित पाण्यामुळे होणारे आजार, साथीचे आजार, वारंवार होणारे संसर्गजन्य रोग.
- सहा महिन्यापर्यंत निव्वळ स्तनपान तसेच सहा महिन्यानंतर स्तनपानाबरोबरच वरचा आहार सुरु करणे याचे अपूरे ज्ञान.
- आहाराच्या अयोग्य पध्दती.

- अज्ञान, अशिक्षितपणा.
- बाल संगोपन व बाल आहाराबद्दल अज्ञान.
- आरोग्य सेवा विषायक अडचणी.
- कमी वयात मुलीचे लग्न व दोन मुलांमधील कमी अंतर यामुळे जन्मत:च कमी वजनाची बालके, अपुऱ्या दिवसांची बालके जन्मास येणे.
- अंधश्रध्दा, रुढी व परंपरेचा अभाव.

---

**महिला आणि किशोरवयीन मुलीसाठी राबविण्यात येणारा निधी नाशिक जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागात पडून असल्याबाबत**

**(४८) ४६६३३ (३०-०४-२०१६). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महिला आणि किशोरवयीन मुलीसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा जवळपास पाच कोटी रुपयांचा निधी नाशिक जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागात पडून असल्याने माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच नाशिक जिल्हा परिषदेमध्ये महिला व बालकल्याण विभागच अस्तित्वात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०१-०६-२०१६) :**(१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) जिल्हा परिषद नाशिक महिला व बाल कल्याण विभागाअंतर्गत महिला व किशोरवयीन मुलींसाठी सन २०१५-१६ याआर्थिक वर्षात जि.प.सेस १८५.००, आदिवासी योजना १७५.०० व विशेष घटक योजना १०२.०० असे एकूण रु. ४६२.०० लक्ष नियतव्यय मंजुर आहे. त्यापैकी प्रत्यक्षात रु २१५.००० लक्ष निधी माहे डिसेंबर, २०१५ पर्यंत उपलब्ध झाला होता व उर्वरित निधी माहे फेब्रुवारी व मार्च २०१६ मध्ये प्राप्त झाला आहे. सदर योजनेवर मार्च, २०१६ अखेर रु.१०१.७७ लक्ष खर्च झालेला आहे. उर्वरित रु.३६०.२३ लक्ष इतका अखर्चित निधी नियोजनानुसार सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात खर्च करण्यात येणार आहे.

---

**मोर्शी तालुक्यातील (जि.अमरावती) पोषण आहार पुरवठा करणाऱ्या महिला बचत गटांना निधी देण्याबाबत**

**(४९) ५२९९९ (०१-०३-२०१६). डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोर्शी तालुक्यातील (जि.अमरावती) पोषण आहार पुरवठा करणाऱ्या महिला बचत गटांना माहे मार्च, २०१५ पासून पोषण आहार वाटपाचा निधी देण्यात आला नाही, हे खरे आहे काय,
(२) सदर बचत गटांना तातडीने निधी देण्यात यावा हा निधी प्रलंबित ठेवणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी अशी मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक ३१ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा.मंत्री, महिला व बालविकास यांचेकडे केली, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०४-०६-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.

यासंदर्भात स्थिानक लोकप्रतिनिधी मा.आमदार मोर्शी यांनी मा.मंत्री (महिला व बाल विकास) यांना दि. ३१.१२.२०१५ रोजी निवेदन दिलेले आहे.
(३) व (४) सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत पोषण आहाराची देयके अदा करण्यासाठी अनुदान प्राप्त झाले होते. त्यानुसार बचतगटांना माहे मार्च, २०१५ ते सप्टेंबर, २०१५ पर्यंतची देयके माहे जानेवारी, २०१६ मध्ये अदा करण्यात आलेली आहेत. तसेच ३१ मार्च, २०१६ रोजी प्राप्त झालेल्या अनुदानातून माहे ऑक्टोंबर, २०१५ ते डिसेंबर, २०१५ या कालावधीची देयके बचतगटांना अदा करण्यात आलेली आहेत. माहे जानेवारी २०१६ व फेब्रुवारी २०१६ या दोन महिन्यांची देयके प्रलंबित आहेत.

तसेच सबला योजनेंतर्गत माहे जून, २०१५ मध्ये प्राप्त झालेल्या अनुदानातून महिला बचतगटांची माहे मार्च २०१५ ते माहे जुन, २०१५ पर्यंतची आहाराची देयके अदा करण्यात आलेली आहेत. तसेच माहे जुलै, २०१५ ते माहे फेब्रुवारी, २०१६ या कालावधीतील देयके अदा करण्यासाठी दि. ३१/३/२०१६ रोजी कोषागाराने सदर देयके स्विकारली नाहीत. त्यामुळे सदर देयके प्रलंबित आहेत.

---

**चंद्रपूर जिल्हयातील नागभीड येथील महिला बचत गटांचे मानधन थकीत असल्याबाबत**

**(५०) ५३४३५ (३०-०४-२०१६). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्हयातील नागभीड येथिल एकात्मिक बालविकास कार्यालयामार्फत एकुण २०३ अंगणवाडी केंद्राला आहार पुरविण्याऱ्या महिला बचत गटांचे मागील ९ महिन्यापासूनचे तब्बल ४५ लक्ष रूपयांचा मोबदला देण्यात आलेला नसल्याचे माहे फेब्रुवारी २०१६ च्या पहिल्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळुन आले व त्यानुषंगाने सदर महिला बचत गटांना थकीत मानधन देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही करण्यत आली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, होणाऱ्या विलंबाचे कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०१-०६-२०१६) :**(१) हे खरे आहे.
(२) व (३) एकात्मिक बाल विकास सेवा योजना, प्रकल्प नागभिड यांना आहार पुरविणाऱ्या बचत गटांना मोबदला अदा करण्यासाठी रु. ६८,६६,५९१/- इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला होता. अनुदान कोषागारातून आहरीत करण्याकरीता देयके सादर केली असता कोषागाराने देयकावर आक्षेप नोंदवून देयके परत करण्यात आली. त्यामुळे अनुदान आहरीत प्राधिकार पत्र रद्द करण्याबाबत आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांना मेलद्वारे निवंती करण्यात आली. प्राधिकार पत्र रद्द होताच देयके पुनश्च सादर करुन बचत गटांना डिसेंबर, २०१५ पर्यंत मोबदला अदा करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.